Rediffusion/Edelman

| Published Date: | 08 Nov 2017 | Publication: | Navrashtra |
|---|---|---|---|
| Edition: | Mumbai | Page No: | 2 |


### १९ नोव्हेंबरला वांद्रेत रंगणार कार्यक्रम

# शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा

मुंबई : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) ही देशातील माहिती तंत्रज्ञानातील सेवा, सल्ला आणि बिझिनेस उपाययोजना पुरवणारी आघाडीची कंपनी असून टीसीएसतर्फे टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ च्या मुंबई पर्वाची घोषणा आज करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानावर आधारित असलेली भारतातील सर्वात मोठी प्रश्नमंजुषा १९ नोव्हेंबर रोजी वांद्रे, लिलावती हॉस्पिटलच्या समोरील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक सभागृहात रंगणार आहे.

आठवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. प्रत्येक संस्थेला अनेक संघ पाठवता येतील. प्रत्येक संघात दोन विद्यार्थ्यांचा समावेश असेल. या प्रश्नमंजुषेसाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात येणार नाही. टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा २०१७ ही स्पर्धा १२ शहरांमध्ये रंगणार आहे. अहमदाबाद, बंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदूर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या १२ शहरांमध्ये ही स्पर्धा होणार आहे. प्रवेश अर्ज १६ नोव्हेंबरच्या आत बर्झिन मेहता, टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा समन्वयक, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस हाऊस), रॅवेलिन स्ट्रीट, २१ डीएस. मार्ग, फोर्ट, मुंबई – ४००००१ येथे पाठवाव्यात. संपर्कासाठी क्रमांक – ०२२-६७७८९०९३/९०८१ किंवा ऑनलाइनद्वारे www.tcsitwiz.com या संकेतस्थळावर नोंदणी करावी.